# नुतणीकरण प्रमाणपत्र

वाचा :-

१. मुख्याध्यापक **पोस्ते पोदार लर्न स्कुल मलकापूर ता. उदगीर जि. लातूर** यांचाप्रस्ताव दि. **१२/०९/२०२२**

२. मुख्याध्यापकयांनी यापुर्वी दिलेली मान्यता, परिशिष्ट-२. तपासणी अहवाल व इतर पुरावे सादर केलेली आहेत.

३. गटशिक्षणाधिकरी यांचा तपासणी अहवाल

४. या कार्यालयाची मान्य टिपणी दिनांक / /२०२२

---

| | | |
|---|---|---|
| **ग्राम** | :- | मलकापूर ता. उदगीर जि. लातूर |
| **दुरध्वनी (संस्थेचा / शाळेचा)** | :- | - |
| **ईमेल (संस्थेचा / शाळेचा)** | :- | - |
| **जावक क्र.** :- क्र./जिपला/शिविप्र/कार्या- १२/पीआर- 8 जि.प.लातूर दि. | | |
| **जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय,** | :- | जिल्हा परिषद, लातूर |
| **(जिल्हा / राज्य यांचेनाव )** | :- | महाराष्ट्र. |
| **क्रमांक** | :- | २७२८०७१३७६१ |
| **व्यवस्थापक (संस्थेचे नाव)** | :- | के. काशिनाथ पोस्ते बहुउद्देशिय सेवा भावी संस्था मलकापूर ता.उदगीर |

**विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत..**

आपला दिनांक **१२/०९/२०२२** च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार /शाळेची केलेलीतपासणी या आधारे मी शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद लातूर. **दिनांक ०१/०४/२०२२** पासून दि. **३१/०३/२०२५** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता **१ ली ते ८ वी** करीता **पोस्ते पोदार लर्न स्कुल मलकापूर ता. उदगीर जि. लातूर** या शाळेसतात्पुरती देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधिन आहे :-**

१. मान्यतेचाकालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन) मधीलतरतुदीचे शाळा पालन करील.

३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्यांच्या किमान २५ % मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्णहोईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

४. परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी परीपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येतील.

५. संस्था / शाळा कोणतीही कॅपीटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाणणी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पडणार नाही.

६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पुर्णहोईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारिरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्णहोईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उतीर्णहोण आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदिनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारीत केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतू आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान ०५ वर्षांच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

Principal
Poste Podar Learn School,
Udgir (Affiliation No.1130968)

Manager / Correspondant
Poste Podar Learn School,Udgir

(सात) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेलीत्याची / तीची कर्तव्ये शिक्षक पार पाडतात आणि,

(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याचीसुनिश्चिती शाळा करील.

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारेतयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करेल.

९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मान्यतातपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणेहोत्या.

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ - **८०००० चौ. मी.**
- एकुण बांधकाम क्षेत्र - **१५५०० चौ.मी.**
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ - **४०००० चौ.मी.**
- वर्ग खोल्यांची संख्या - **३४**
- कार्यालय - नि- भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली - **०८**
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायीस्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल - **होय.**
- पिण्याच्या पाण्याची सुविधा - **होय.**
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वंयपाकघर - **लागू नाही.**
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रीडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता - **होय.**
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध - **होय.**

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगणे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्या येतील

१३. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा, कोणत्याही व्यक्तींच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखेसनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेख विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक **२७२८०७१३७६१**असा आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपयातो नमूद करावा. याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेनेसादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पुर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सुचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नुतनीकरण केल्याचीसुनिश्चिती करावी.

१९. जोडपत्रातील नुसार इतर शर्ती या सोबत जोडल्या आहेत.

**१. टिप :- १ ते १० मानके पुर्ण करण्याच्या अटीवर बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वये यापुर्वी दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे शाळांना आरटीई मान्यता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.**

**२. मान्य तुकड्यानुसार विद्यार्थी प्रवेश द्यावेत जादा प्रवेश दिल्यास अमान्य राहतील.**

(वंदना फुटाणे)
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, लातूर**

शिक्षणाधिकारी (प्रा.)
जिल्हा परिषद, लातूर

Principal
Poste Podar Learn School,
Udgir (Affiliation No.1130968)

Manager / Correspondant
Poste Podar Learn School,Udgir